महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१५१८/प्र.क्र. २३३/प्रनिप्रा/१०००  दिनांक : 07 NOV 2019

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राजय तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१९ रोजी सकाळी ११:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड .... सदस्य

२) डॉ. ए.जी. पाठक, प्र. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक .... सदस्य

३) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य .... सदस्य

४) श्री. आ.ए. रायते (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य. .... सचिव

१) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, सदस्य तथा कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. धनराज माने, सदस्य तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ३) श्री. विश्वजीत माने, (भा.प्र.से.) सदस्य तथा सदस्य सचिव व महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी बैठकीस उपस्थित राहणार नसल्याचे कळविले होते, या अनुषंगाने नोंद घेण्यात आली.

२) प्राधिकरणाच्या उक्त बैठकीत बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या बैठकीचे विषयनिहाय इतिवृत्त खालील प्रमाणे आहे,-

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | **भाग – अ (अवलोकनार्थ)** | |
| १. | शासन अधिसूचना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २२/०८/२०१९ अन्वये गठीत करण्यात आलेल्या प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य यांचे प्रथम बैठकीस स्वागत व परिचय. | दिनांक २२/०८/२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार, गठित करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्य यांचे स्वागत करण्यात आले तदनंतर सर्व मा. सदस्यांनी आपला परिचय प्राधिकरणास करुन दिला. |
| २. | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क) यांचे विनियमन), अधिनियम, २०१५ चे सादरीकरण. | सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, म.रा. यांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क) यांचे विनियमन), अधिनियम, २०१५ चे सादरीकरण केले तदनुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. |
| ३. | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क) यांचे विनियमन), अधिनियम, २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अस्तित्वात आल्यापासून सुरु असलेल्या कामकाजाचे सादरीकरण. | सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, म.रा. यांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क) यांचे विनियमन), अधिनियम, २०१५ अस्तित्वात आल्यापासून ते दिनांक २२/०८/२०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार गठित करण्यात आलेल्या नविन प्रवेश नियामक प्राधिकरण या कालावधीमधील तत्कालीन प्रवेश नियंत्रण समिती / प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कामकाजाच्या कार्यपध्दतीबाबत सादरीकरण केले व तदनुषंगाने सांगोपांग चर्चा केली. |
| ४. | तत्कालीन प्रवेश नियामक समितीच्या दिनांक ७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ. | सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, म.रा. यांनी तत्कालीन प्रवेश नियंत्रण समिती / प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ सादर केले |
| | **भाग – ब (निर्णयाकरिता)** | |
| ५. | प्राधिकरणाच्या माहितीकरिताचे प्रस्ताव (विवरणपत्र - अ) - प्राधिकरणाच्या निर्णयासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येत असून सदर प्रस्ताव आवश्यकतेनुसार प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येतील. | नोंद घेतली |



7/11/19

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | **भाग - क (माहितीकरिता व इतर)** | |
| ६. | प्राधिकरणाच्या माहितीकरिताचे प्रस्तावं,- | |
| अ) | माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०१९ या कालावधीतील प्राधिकरण व सीईटी कक्षातील हिशोबाचा तपशील | सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी माहे ऑगस्ट ते सप्टेंबर २०१९ या कालावधीतील प्राधिकरण व सीईटी कक्षातील हिशोबाचा तपशील प्राधिकरणाच्या माहितीकरिता सादर केला व तदनुषंगाने सांगोपांग चर्चा केली. |
| ब) | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उच्च शिक्षण विभागाअंतर्गत् अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक. | मागील काही महिन्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उच्च शिक्षण विभागाअंतर्गत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आल्याने सीईटी कक्षाकडून प्रवेश प्रक्रियेसंबंधी सुधारित वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले असल्याचे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, म.रा. यांनी प्राधिकरणास अवगत केले. |
| क) | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेश प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाच्या दिनांक २३/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेली मान्यता. | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये चारही कृषि विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत ९३१ जागा आणि संस्थात्मक कोटयातील ५९६ जागा अशा एकुण १५२७ रिक्त जागा भरण्यासाठी कृषि विद्यापीठास्तरावर वाढीव प्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यास कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २३/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली असल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, म.रा. यांनी प्राधिकरणास अवगत केले. |
| ड) | प्राधिकरणाच्या सफलता पोर्टलचे सादरीकरण | मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने शैक्षणिक वष्र २०१८-१९ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश तपासणी/पडताळणी तसेच प्रवेश मान्यतेसंदर्भात निर्माण करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या 'सफलता' या ऑनलाईन पोर्टलद्वारे राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचे सादरीकरण करण्यात आले व तदनुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. |

In the Meeting the following instruction s were given to the Commissioner, State CET-Cell /Secretary, Admissions Regulating Authority, Mumbai,-

1. The surplus funds of the CET Cell as well as Admissions Regulating Authority should be kept in Nationalised Bank as per Law.



2/11/19

2. Wherever as per Act, Government rules / instructions received by Authority, the Secretary should study and put up the papers for neessary action to Authrotity. For framing regulations by Authority regarding various subjects as per law regarding administrations, accounts, functions, powers etc. this information should be called from corresponding Authoritites in the State as well as Other States. For this pupose visits should be arranged to these Authorities, if necessary, as early as possible.

3. The Members of the Authority may also visit the concerned Colleges, Universities, Directorates wherever they find in convenient and should bring their suggestions for effective functioning of the Authority regarding CET / other matters as per law/rules/ regulations, etc.

Admissions Regulating Authority, Mumbai
Maharashtra State

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 7/11/19